# पक्ष्यांची रंगीबेरंगी दुनिया/
# माझा पक्षीजगतातला विहार/ *(किंवा योग्य वाटेल ते)*

टेकडीवरती झाड आणि झाडावरती पक्षी,
पक्ष्यांच्या गळ्याभोवती गाण्याची नक्षी

कवयित्री हेमा लेले यांची ही कविता अनेक वर्षांपूर्वी वाचली होती आणि अनेकदा गुणगुणतही होतो. पण तुमच्यापैकी काही जणांचे ज्ञान कावळा, चिमणी, कबुतर, पोपट अशा नेहमी दिसणाऱ्या पक्षांपलीकडे नसते तसे माझेही होते. पण गेल्या ७-८ वर्षांमध्येच मला पक्षीनिरीक्षणाची आवड निर्माण होऊन त्याचे छंदात रुपांतर झाल्यावर २-३ वर्षांतच मला परिसरात दिसणारे जांभळा शिंजिर (पर्पल सनबर्ड), मुनिया, खंड्या असे अनेक पक्षी ओळखू येऊ लागले. लहानपणापासून आवाज जरी ऐकत होतो तरी कोकिळ आणि कोकिळा हे अगदी वेगळे दिसतात हे वयाची पन्नाशी ओलांडल्यावरच समजले! मग एक कॅमेरा हातात आला आणि मी जमेल तसे पक्ष्यांचे फोटो काढू लागलो. मित्रमंडळींबरोबर पुण्यातील वेताळ टेकडी, तळजाई, सिंहगड पायथा, कवडी पाट, भिगवण




इथे फेऱ्या सुरू झाल्या आणि पक्ष्यांच्या या अनोख्या दुनियेत माझा प्रवेश कधी झाला ते कळलेच नाही. पक्ष्यों मी काढलेले फोटो जेंव्हा इतरांना दाखवले तेंव्हा त्यांनाही ते आवडू लागले. फेसबुक. यु ट्युब, व्हॉट्स ॲप या सोशल मिडियातूनही अनेकांपर्यंत पोचता आलं. जगभरातील पक्षीप्रेमी फोटो पोस्ट करतात अशा अनेक ग्रुप्समध्ये सामील झालो. मी उत्साहाने आपल्या परिसरातील आणि बाहेर काढलेले फोटो पोस्ट करू लागलो. २०१८ मध्ये मी यातील निवडक फोटोंचे टेबल कॅलेंडर काढले. आणि माझा आनंद आता शेकडो लोकांमध्ये मी वाटायला लागलो. यात पक्ष्याच्या रंगीत छायाचित्राबरोबरीने एखादे समर्पक असे संदेश वाक्यही (कॅप्शन) देऊ लागलो. गेली पाच वर्षे माझ्या कंपनीतर्फे वितरित केलेले कॅलेंडर भारतातील अनेक शहरांमधील



तसेच अमेरिका, इंग्लंड, दुबई, कतार या देशातल्या पक्षीप्रेमी लोकांच्या टेबलांवरती विराजमान झाले आहे. नंतर मी वाढदिवसाच्या किंवा नूतन वर्षाच्या शुभेच्छा म्हणूनही पक्ष्यांचे फोटो पाठवायला लागलो. त्यालाही चांगला प्रतिसाद मिळाल्याने मी चहा/कॉफीच्या मग्जवरही पक्षी आणि प्राणी यांचे फोटो स्क्रीन प्रिंटिंग करून छापून घेतले. ते सुद्धा लहान मुलांसह सर्वांनाच आवडले आहेत.



पुणे परिसराला निसर्गाचे वरदान आहे. पुणे शहरातून वहाणाऱ्या डबकेवजा मुठा नदीत सुद्धा डिसेंबर ते मार्च या काळात चित्रबलाक (स्टॉर्क) सारखे पक्षी असतात त्याचेही मी फोटो काढले. हा फोटो मी म्हात्रे पुलावरून काढला आहे.

मी काढलेले फोटो ग्रेट वगैरे असतात असे काही मला वाटत नाही पण पक्ष्यांचे आकर्षण हे सर्व वयाच्या लोकांमध्ये आहे हे लक्षात आल्याने माझे काम सोपे झाले. त्याचा परिणाम म्हणून हे फोटो बघून अनेक जण आता खरे पक्षीही बघायला लागले आहेत आणि ते ओळखण्याचाही प्रयत्न करू लागले. हा प्रतिसाद माझा उत्साह वाढवणारा होता. कोथरूड भागात असलेल्या आमच्या सोसायटीच्या आवारातच वर्षभरात मला ३० पेक्षा अधिक जातींच्या पक्ष्यांचे फोटो काढता आले. सोसायटीच्या क्लबहाऊसमधे नंतर केलेला स्लाईड शो बघून काही दिवसाने लहान मुले काका, काल मला किंग फिशर दिसला आणि मी त्याचा फोटोही काढला असे सांगायला लागली. नंतर एकदा सोसायटीच्या वॉचमनच्या सहायाने पतंगाच्या मांजात अडकलेल्या एका कोकिळेची सुटका करण्यातही मला यश आलं.

माझ्या फोटोग्राफीच्या कौशल्याचे वर्णन करण्याकरता हेतुने हे मी लिहिले नसून, कुठल्याही वयात छंद जोपासून आपल्याला मिळणाऱ्या आनंदात अनेकांना सामील करून घेता येतं हे सांगण्याकरता आहे. महत्त्वाचं हे की माझं पक्षीप्रेम मी अनेकांपर्यंत पोचवू शकलो. मी कुठल्याही उद्देशाने देशात-परदेशात प्रवास केला तरी माझ्याजवळ



कॅमेरा ठेवतो आणि संधी मिळताच फोटो काढतो. रिसॉर्टच्या आवारातही अनेकदा येणाऱ्या पक्ष्यांचे चांगले फोटोमिळू शकतात. संगीत कार्यक्रमाकरता ऑस्ट्रेलियातील पर्थ शहरात गेलो तेंव्हा फिरताना काढलेला हा पेलीकन ( झोळीवाला) पक्षाचा फोटो आहे. गंमत म्हणजे मी हा फ़ोटो काँप्युटरवर बघेपर्यंत त्याच्या चोचीतला मासा मला दिसला नव्हता!

**समृद्ध पक्षीजगत**

पक्षी म्हणजे उष्ण रक्ताचे, उच्च चयापचय (मेटॅबोलिझम) असलेले, मणका, चोच आणि पिसे असलेले अंडी घालणारे प्राणी. त्यांच्या पंखात खूप ताकद असते आणि त्यांची श्वसनसंस्थाही विलक्षण कार्यक्षम असते. त्यांच्या आकारात, वजनात, दिसण्यात, रंगामध्ये, सवयींमध्ये प्रचंड विविधता आहे. सर्व जगात पक्ष्यांच्या सुमारे १०,००० जाती(स्पेसीज) आहेत त्यापैकी सुमारे १३०० जाती भारतात आहेत. यातील ७० जाती फक्त भारतातच (याला एंडेमिक म्हणतात) दिसतात. जागतिक पातळीवर जैविक विविधतेच्या बाबतीत आपला देश दहाव्या क्रमांकावर आहे ही आपल्याकरता भाग्याची गोष्ट आहे. भारतात पश्चिम घाट, ताडोबा- जिम कॉर्बेट सारखी अभयारण्ये, अरुणाचल, भरतपूर, सिक्कीम, थेट्टेकड, कोकण असे अनेक भाग पक्षीजीवनाने समृद्ध आहेत. या व्यतितिक्त परदेशातून स्थलांतरित पक्षी सुद्धा मोठ्या संख्येने दरवर्षी येत असतात. त्यामुळे पक्षीनिरीक्षणाला आपल्या देशातच मोठी संधी आहे.

**निसर्ग साखळीतील महत्त्वाचा घटक**

पक्षी हे निसर्गातील महत्त्वाची भुमिका बजावतात. ते अळ्या आणि अन्य कीटक खाऊन झाडांचे संरक्षण करतात. त्याबरोबरीने उंदीर-घुशी खाऊन पिकांचेही संरक्षण करतात. परागीभवन (पोलिनेशन) करून वनस्पतींचा विस्तार व्हायला मदत करतात. परिसरातील मृत प्राणी खाणारे गिधाडांसारखे पक्षी हे तर स्वच्छतादूत आहेत.

पक्ष्यांचे स्थलांतर (मायग्रेटरी बर्ड) हा निसर्गातला मोठा चमत्कार समजला जातो. कित्येक हजार मैलांवरून अनेक पक्षी आपल्या देशात नियमित वेळी दर वर्षी येतात आणि काही महिने इथे राहून परत त्यांच्या देशात जातात. या स्थलांतराचा अभ्यास गेली अनेक वर्षे होतो आहेत आणि यावरून कितीतरी नवीन माहिती आता उपलब्ध झाली आहे.



या फोटोत असलेले हे बार हेडेड गूज (पट्टेरी कदंब) दर वर्षी डिसेंबरमध्ये मंगोलियातून येऊन सोलापुर रस्त्याजवळच्या भिगवण तलावात येऊन मुक्काम करतात. येतान ते एव्हरेस्ट शिखरावरून उडून येतात असे निरीक्षण नोंदवले गेले आहे. दरवर्षी भिगवण आणि नवी मुंबईला येणारे फ्लेमिंगो आणि स्टॉर्कही अनेकांनी बघितले असतील.

**माझे मार्गदर्शक**

सुरवातीच्या काळात माझा हात धरून पुढे नेणारे आणि या विषयाची गोडी लावणारी मित्रमंडळी मला भेटल्यामुळेच मला पक्षीनिरीक्षणात थोडीशी गती आली. सहलीमध्ये दिसलेल्या आणि आवाज ऐकू आलेल्या प्रत्येक पक्ष्याची (नाव आणि संख्या) काटेकोर नोंद करणारे प्रसिद्ध पक्षीतज्ञ आणि लेखक किरण पुरंदरे, वनस्पती, प्राणी आणि पक्षी यांचे सखोल ज्ञान असणारे  डॉ. पराग महाजन (संस्था:बियॉन्ड वाईल्ड) आणि लाबंवरूनसुद्धा आवाज ऐकून पक्ष्याची ओळख पटवणारे राहूल राव(संस्था:फोलिएज) यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. या छंदात माझी पत्नी सीमा आणि मुलगा पुष्कर हे सुद्धा सामील झाले आणि अभयारण्याच्या सहली आम्ही एकत्रित करत असतो. लॉकडाऊनच्या काळात आमच्या घरातील बाल्कनीत बुलबुल पक्षाने घरटे केले होती. घरटे बांधण्यापासून ते पिलू उडून जाईपर्यंत सर्व हालचालींचे छायाचित्रण करून आम्ही एक क्लिप तयार केली. आश्चर्याची बाब म्हणजे ज्या दिवशी ते पिलू घरट्याबाहेर पडले त्याच दिवशी ते आईच्या मार्गदर्शनाखाली थोडे-थोडे चालायला लागले आणि बघता बघता उडूनही गेले. पक्षी किती लगेच  आत्मनिर्भर होतात हे त्यावेळी जाणवले. (https://youtu.be/kh2oJNNIBXw या युट्युबवर लिंकवर झेप घे पाखरा ही क्लिप बघता येईल.) काही दिवसांनी मुनियांनी पण त्याच जागी घरटे केले होते. एक-एक पान आणून घरटे करताना आणि ते पान खाली पडले तरी प्रयनपूर्वक पुन्हा चोचीत पकडून पुन्हा लावतानाचे शुटिंग़ केले आहे. आपणही असे चिकाटीने प्रयत्न करण्याचा धडा त्यांच्याकडून शिकू शकतो हे लक्षात आले.

**महाग कॅमेरा आवश्यक आहे का?**

तुमचा कॅमेरा खूप भारी असेल ना? असा प्रश्न हमखास विचारला जातो. याचे उत्तर नाही असे आहे. किती भारी कॅमेरा/लेन्स वापरले यावर फोटोंची गुणवत्ताअवलंबून नसते. या लेखात छापलेले बरेच फोटो हे ब्रिज कॅमेरा वापरून काढलेले आहेत. आणि तो फारसा महाग नसतो. प्रवासात न्यायलाही तो सुटसुटीत आणि सोयीचा असतो. अजून तरी मोबाईल फोनमधल्या कॅमेऱ्याने लांबवर असलेल्या आणि उडत असलेल्या पक्ष्यांचे चांगले फोटो काढता येत नाहीत. पण उत्तम छायाचित्रकार व्हायला भारी कॅमेरा आणि मोठ्या लेन्सेसपेक्षा ही यंत्रे वापरणाऱ्याची नजर आणि कॅमेरा हाताळण्याचं कौशल्य किती आहे हे जास्त महत्त्वाचं असतं. फोटोशॉप सारखे फोटोएडिटरही आता तुमच्या मदतीला आहेत. पण असे फेरफार करताना नैसर्गिकता तशीच राहील हे सुद्धा बघावे लागते. कुतुहल, निरीक्षण करण्याची आवड आणि उत्साह हे गुण तर हवेच पण शांतपणे काहीही न करता आणि आसपास काहीही घडत नसताना बराच वेळ वाट बघण्याचीही सवय असणे आवश्यक आहे. चांगला फोटो

येण्याकरता योग्य प्रकाश तर हवाच. पण त्याबरोबरीने पक्षी कसा आणि कुठे बसला आहे, कुठे बघतोय, किती हालचाल करतोय, या बाबींनीही फरक पडतो. खरे पक्षी निरीक्षक तर पक्षी प्रत्यक्ष दिसण्यापूर्वीच लांबवरून केवळ आवाजावरून म्हणजे बर्ड कॉल ऐकूनच कोणता पक्षी (नर/मादी) या परिसरात आहे आणि तो साधारण कुठे असेल हे सांगू शकतात. काही शाळकरी मुलांनाही पक्ष्यांची चांगली माहिती असते आणि व्यवस्थितपणे कॅमेरा हाताळून ते छान-छान छायाचित्रेही टिपतात.

**पक्षी कसे ओळखायचे?**

एकदा निरीक्षणाला सुरवात केली की मग हळुहळु पक्ष्यांची नावे लक्षात रहायला लागतात आणि त्यांच्यातला फरकही समजायला लागतो. गंमत म्हणजे एकाच जातीतले नर, मादी किंवा पिल्लू हे वेगवेगळ्या रंगाचे/ आकाराचे असतात. इतकेच काय विणीच्या हंगामात काही जातीतल्या पक्ष्यांच्या नर-मादीचे नेहमीचे रंग बदलू शकतात. यामुळे पक्ष्याचे अचुक नाव कळण्याकरता तो कुठे आणि कधी बघितला आहे हा तपशीलही महत्त्वाचा ठरतो. तज्ञांनी लिहिलेली अनेक पुस्तके तुमच्या मदतीला आहेत. त्यात पक्ष्यांचे वर्णन आणि सुरेख चित्रे पण आहेत. याशिवाय काहीच कष्ट न करता थेट तोंडात घास हवा असेल तर गुगल लेन्स, गुगल इमेज आणि इतर ॲप आहेतच. पण स्वत: निरीक्षण करून, फील्डगाईडचा उपयोग करून अभ्यास करण्याची सवय लावली तर सुरवातीला जरी थोडा त्रास झाला तरी तुम्ही इतरांच्या मदतीशिवाय पक्षी ओळखू शकाल. जसे शास्त्रीय संगीतात एखाद्याच स्वराच्या फरकाने राग बदलतो तसेच पक्षाच्या चोचीच्या आकारात, मानेवरच्या, किंवा पंखावरच्या रंगात किंवा डिझाईनमध्ये थोडा-थोडा फरक होऊन पक्ष्याचे नाव बदलते.

**पक्ष्यांकडून काय शिकतो?**

जसजसे माझे निरीक्षण वाढायला लागले आणि पक्ष्यांची माहिती व्हायला लागली तसे त्यांच्याकडून आपण कित्येक गोष्टी शिकू शकतो असंही लक्षात यायला लागलं. त्यातील काहींचा उल्लेख करावासा वाटतो. जेंव्हा कावळा त्याच्यापेक्षा मोठ्या ससाण्याला पळवून लावतो तेंव्हा कळते की अंगात धाडस असले तर ताकदवान शत्रुलाही हरवता येते. सुगरण पक्ष्याच्या घरट्यातील सुबकता आणि शिंपी पक्षाच्या घरट्याची कलाकुसर आपणही शिकू शकतो. नियमितपणा, सातत्य आणि चिकाटी हे तर सर्वच पक्ष्यांचे गुण आहेत.

ब्लॅक बर्ड आणि विसलिंग थ्रश सारखे गाणारे पक्षी उंच झाडावर किंवा इमारतीच्या टोकावर बसून गाताना त्यांच्याबरोबरीने आसमंतातल्या सर्वांनाच त्यांच्या आनंदात सहभागी करून घेतात. उंच शिखरांवरून झेप घेणारे स्थलांतर करणारे पक्षी तुम्हीही अशी झेप घेऊ शकतो असे सांगत असतील का? निसर्गाने आकर्षक रंग बहाल केलेल्या अनेक पक्षांकडे बघून आपल्या जीवनातही असे रंग आपण आणावेत असं वाटल्याशिवाय रहात नाही. परिस्थितीशी जुळवून घेतल्यानेच पक्षी सर्व तऱ्हेच्या संकटांचा सामना करू शकतात. कलाकारांना गरुडासारख्या पक्ष्यांच्या भरारीतून आणि मोरासारख्या पक्षाच्या दिमाखदार आणि बहुरंगी पिसाऱ्यातून कल्पकतेला नक्कीच उत्तेजन मिळाले आहे. जेंव्हा खंड्या (किंगफिशर) पक्षी नेम धरून पाण्यातला मासा पकडतो तेंव्हा फोकस असणे म्हणजे ध्येयावर नजर कशी ठेवली पाहिजे हे आपल्याला दाखवून देतो.



**आपण काय करू शकतो?**

ऐदी कबुतरांना खायला घालू नका, या शीर्षकाचा किरण पुरंदरे यांनी दै. सकाळ मध्ये लिहिलेला लेख मी पूर्वीच वाचला होता. कबुतरांपासून फुप्पुसाचे रोगही होऊ शकतात असे दिसून आले आहे. काही व्यापारी धर्मात सांगितलंय असं म्हणून पुण्य मिळण्याकरता रोज कबुतरांना दाणे टाकतात. ते तर त्यांनी बंद केलेच पाहिजे पण आपण सुद्धा पक्ष्यांना शिजवलेले अन्न खायला देऊ नये असेच पक्षीतज्ञांचे म्हणणे आहे. तशा सूचनाही सर्वत्र लिहिलेल्या असतात, आपण सर्वांनी त्यांचे पालन करावे असे मला वाटते. आपली जिज्ञासा जागृत ठेवून आपण जैवजगताची अधिक माहिती करून घेऊ शकतो. पर्यावरणरक्षणाकडे केवळ कर्तव्य म्हणून न बघता सर्व वनस्पती, पक्षी, प्राणी, कीटक हे निसर्गसाखळीतील घटक आपले आपले जीवन समृद्ध करणारे आहेत ही भुमिका ठेवू यात. जेंव्हा आपण फ्लेमिंगो बघायला भिगवणला जातो किंवा ताडोबासारख्या अभयारण्यात जातो तेंव्हा फक्त ती एक सहल/आउटिंग़ असे त्याकडे न बघता तेथील निसर्गाचे निरीक्षण आपल्याला करता येईल. आपल्याला निसर्गस्नेही जीवन शैलीचा किती प्रमाणात अंगिकार करता येईल याचाही आपण विचार करू शकतो. परिसरातील झाडे न तोडणे, नवीन झाडे लावणे, पाणवठे जपणे, नद्यांचे, तलावांचे प्रदुषण रोखणे, विघटन न होणाऱ्या प्लॅस्टिकचा वापर टाळणे, रसायनांचा वापर कमी करणे अशा कितीतरी गोष्टी आपण आपल्या पुरत्या करून दररोजच वसुंधरा दिन साजरा करू शकतो. आणि मग एकदा का या पक्ष्यांच्या रंगांनी, गोड आवाजाने आणि भरारीने तुमच्या मनात घर केले की तुमची पावले माझ्यासारखीच आपसूक जंगलाकडे वळतील.

****